# मंत्रिमंडळ निर्णय

**१ डिसेंबर २०१५**

**( मंत्रिमंडळ बैठक क्र. ५७ )**

| अ.क्र. | विषय | विभाग |
| --- | --- | --- |
| १ | **प्रधानमंत्री आवास योजना ५१ शहरांमध्ये राबविणार** | गृहनिर्माण |
| २ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्था<br>**सदस्य होण्यासाठी शौचालय असणे आणि वापरणे बंधनकारक** | नगर विकास |
| ३ | **महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ स्थापन करण्याचा निर्णय** | वन |
| ४ | पिंपरी चिंचवड विकास योजना<br>**खेळाच्या मैदानासाठी स्वतंत्र उपयोग नसलेले क्षेत्र आरक्षणातून वगळण्यास मान्यता** | नगर विकास |
| ५ | अशासकीय अनुदानित शाळा<br>**व्यवसाय, द्विलक्षी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील पूर्णवेळ शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी** | कौशल्य विकास व उद्योजकता |
| ६ | ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी निर्णय<br>**एफआरपीची उर्वरित रक्कम देण्यासाठी कारखान्यांना सॉफ्ट लोन योजनेचा लाभ** | सहकार |

## प्रधानमंत्री आवास योजना
## ५१ शहरांमध्ये राबविणार

प्रधानमंत्री आवास योजना ही केंद्र पुरस्कृत योजना राज्यामध्ये एक लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेली शहरे तसेच या योजनेत समावेश न होऊ शकलेली सर्व जिल्हा मुख्यालये (सिंधुदुर्ग जिल्ह्यात ओरोस ऐवजी सावंतवाडी हा अपवाद वगळता) अशा एकूण ५१ शहरांमध्ये राज्याच्या सहाय्यासह लागू करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

या योजनेतील चार भागांपैकी व्याजाची सवलत देण्याच्या भागात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटातील व्यक्ती व अन्य घटकासाठी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील व्यक्ती पात्र ठरतील. याबाबतच्या आर्थिक उत्पन्नाच्या मर्यादा केंद्र शासनाच्या धोरणानुसार सुधारित करण्यात आल्या आहेत.

त्यानुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थी गटासाठी (Economic Weaker Section) केंद्र सरकारची वार्षिक उत्पन्न मर्यादा तीन लाख रुपये इतकी आहे. ती राज्य सरकारकडून सध्या अल्प उत्पन्न गट म्हणून एक लाख ८० हजार इतकी होती. आता ही मर्यादा केंद्राप्रमाणेच सुधारित करण्यात आली असून ती तीन लाख इतकी झाली आहे. अल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांसाठी (Lower Income Group) केंद्र सरकारची वार्षिक उत्पन्न मर्यादा तीन लाख ते सहा लाख इतकी आहे. या गटासाठी राज्य सरकारची मर्यादा एक लाख ८० हजार ते चार लाख ८० हजार इतकी होती. मात्र, सुधारित मर्यादा केंद्राप्रमाणेच तीन लाख ते सहा लाख इतकी करण्यात आली आहे.

ही योजना चार भागात राबविण्यात येणार असून तिच्या पहिल्या घटकात जमिनीचा साधनसंपत्ती म्हणून वापर करुन त्यावरील झोपडपट्ट्यांचा “आहे तेथेच” या तत्त्वावर पुनर्विकास करणे अपेक्षित आहे. केंद्र शासनाकडून एक लाख रुपये प्रतिघरकुल याप्रमाणे अनुदान देण्यात येणार असून त्या जोडीला राज्य शासनाकडून एक लाख रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे.  ही योजना झोपडपट्टी पुनर्वसन योजना (एसआरए) राबविण्यात येत असलेल्या शहरांत लागू होणार नाही.

या योजनेच्या दुसऱ्या भागात कर्ज आधारित व्याज अनुदानाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अल्प उत्पन्न गटासाठी परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे अपेक्षित आहे. ही योजना बँकांच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे. या भागात आर्थिकदृष्ट्या दुर्बल लाभार्थ्यांसाठी तीन लाख रुपये व अल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांसाठी सहा लाखापर्यंतच्या कर्जावर साडेसहा टक्के इतके व्याज अनुदान १५ वर्षासाठी देण्यात येणार आहे.

या योजनेच्या तिसऱ्या घटकात खाजगी भागीदारीद्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे अपेक्षित आहे. यामध्ये ३० चौरस मीटर चटई क्षेत्रापर्यंतची घरकुले संबंधितांना बांधता येतील. या प्रकारात सादर करण्यात येणाऱ्या प्रकल्पामध्ये किमान २५० घरकुले असणे आवश्यक असून त्यापैकी  किमान ३५ टक्के घरे आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी असल्यास असे प्रकल्प परवडणाऱ्या घरांचा प्रकल्प म्हणून गणले जाणार आहेत. केंद्राचे अनुदान प्रति घरकुल दीड लाख रुपये व राज्य शासनाकडून एक लाख रुपये प्रति घरकुल अनुदान देण्यात येणार आहे.

या योजनेच्या चौथ्या भागात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यांद्वारे वैयक्तिक स्वरुपातील घरकुल बांधण्यास अनुदान देण्यात येणार आहे. मात्र, एखादे स्वतंत्र घर या  योजनेमध्ये अंतर्भूत होणार नाही. असे घर बांधण्यात येणारे क्षेत्र हे सर्वांसाठी  घरे (Housing for All Plan of Action) या योजनेचा

भाग असणे आवश्यक आहे. या घटकातील लाभार्थ्यांना केंद्राचे अनुदान प्रति घरकुल दीड लाख रुपये तर राज्य शासनाचे अनुदान एक लाख रुपये इतके देण्यात येणार आहे.

या योजनेची अंमलबजावणी म्हाडा, सिडको, एमएमआरडीए, एनआयटी, एसपीपीएल सारख्या निमशासकीय संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत करण्यात येणार आहे. या संस्थांमार्फत तयार केलेले प्रकल्प राज्यस्तरीय सुकाणू अभिकरणामार्फत राज्यस्तरीय अभियान संचालकांना व अंतिमत: मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय मंजुरी व सनियंत्रण समितीसमोर मान्यतेसाठी सादर करण्यात येतील. संचालक पदावर वरीष्ठ भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येईल.

-----o-----

नगर विकास विभाग

नागरी स्थानिक स्वराज्य संस्था

## सदस्य होण्यासाठी शौचालय असणे आणि वापरणे बंधनकारक

महापालिका, नगरपालिका यासारख्या नागरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे सदस्य होण्यासाठी स्वत:च्या निवासस्थानी शौचालय असणे आणि त्याचा वापर करणे अनिवार्य करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मध्ये तरतूद करण्यात येणार आहे.

याआधी ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी संबंधित उमेदवाराच्या निवासस्थानी शौचालयाची सुविधा उपलब्ध असणे आणि त्या सुविधेचा ते नियमितपणे वापर करीत असणे आवश्यक करण्यात आले आहे. याबाबत मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मध्ये तरतूद करण्यात आली आहे.

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) च्या धर्तीवर राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी सुरू आहे. या अभियानात शहरांमधील उघड्यावर शौचास जात असलेल्या कुटुंबांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देणे हा एक महत्त्वाचा कार्यक्रम आहे. २०११ च्या जनगणनेनुसार राज्याची नागरी लोकसंख्या ५ कोटी ८ लाख २७ हजार ५३१ एवढी असून एक कोटी आठ लाख १३ हजार ९२८ कुटुंबसंख्या आहे. या कुटुंबांपैकी आठ टक्के कुटुंबांकडे शौचालयाची सुविधा उपलब्ध नाही. त्यानुसार राज्यातील नागरी भागातील ८ लाख ३२ हजार कुटुंबांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करून द्यावयाची आहे. शहरांना २ ऑक्टोबर २०१७ पर्यंत हागणदारीमुक्त करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी या अभियानाची अंमलबजावणी -मिशन मोड◦ पद्धतीने ३६६ नागरी स्वराज्य संस्थांमध्ये सुरू करण्यात आली आहे.

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शहरातील लोकप्रतिनिधींचा सहभाग महत्त्वाचा आहे. त्यासाठी शहरातील सर्व लोकप्रतिनिधींकडे शौचालयाची सुविधा उपलब्ध असणे आणि त्या सुविधेचा नियमतपणे वापर करणे आवश्यक करण्यात आले आहे.

-----o-----

## महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ स्थापन करण्याचा निर्णय

राज्यातील वन क्षेत्रावर आधारित निसर्ग पर्यटनास चालना देण्यासाठी महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ स्थापन करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. हे मंडळ राज्यातील ४८ अभयारण्ये, सहा राष्ट्रीय उद्याने आणि चार संवर्धन राखीव क्षेत्रे अशा ५८ वन्यजीव संरक्षित क्षेत्रातील निसर्ग पर्यटनाला चालना देणार आहे.

या मंडळासाठी नियामक आणि कार्यकारी मंडळ स्थापन करण्यात येणार असून त्याचे मुख्यालय नागपूर येथे राहणार आहे. नियामक मंडळाचे अध्यक्ष वनमंत्री, तर कार्यकारी समितीचे अध्यक्ष प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) नागपूर हे राहतील. हे मंडळ स्थापन करण्यासाठी संस्थांची नोंदणी अधिनियम १८६० नुसार नोंदणी करण्यात येणार आहे.

हे मंडळ संपूर्ण राज्यातील वन, वन्यजीव आणि वन विकास महामंडळाच्या वन क्षेत्रात निसर्ग पर्यटन, नियोजन व नियमन करणार आहे. राज्यातील प्रसिद्ध वन्यजीव क्षेत्रात दरवर्षी सुमारे दहा लाख पर्यटक भेट देत असून भविष्यात यात मोठ्या प्रमाणावर वाढ अपेक्षित आहे. राज्यातील इतर विभाग, या क्षेत्रातील इतर घटक, इतर राज्यातील संबंधित विभाग आणि केंद्र शासनाशी निसर्ग पर्यटन विषयातील बाबीसंबंधी समन्वय साधणार आहे. या मंडळाकरिता आवश्यक असणारी सहा पदे वन विभागाच्या संबंधित संवर्गातून प्रतिनियुक्तीने भरण्यात येणार आहेत.

राष्ट्रीय उद्यान, अभयारण्य आणि व्याघ्र प्रकल्पांकडे पर्यटकांचा ओढा मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. निसर्ग पर्यटनाच्या सुविधा वाढविण्यासोबतच या क्षेत्रातील जैविक विविधतांचे संरक्षण, संवर्धन करणेही गरजेचे आहे. स्थानिकांची उपजीविका, स्थानिक लोकांची संस्कृती जतन करणे, तसेच पर्यावरणाचा कोणताही ऱ्हास न होता निसर्ग पर्यटनाच्या विकासासाठी निसर्ग पर्यटन धोरण जाहीर करण्यात आले आहे. वन संपदेला धक्का न लावता स्थानिक रोजगार निर्मिती करण्याची क्षमता निसर्ग पर्यटनामध्ये आहे. पर्यटनस्थळांचा विकास व उपयोग सुयोग्य पद्धतीने केला तरच वनांच्या शाश्वत संवर्धनासोबतच निसर्ग पर्यटनाला चालना मिळणार आहे.

निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या माध्यमातून निसर्ग संवर्धन, शिक्षण, पर्यटन आणि स्थानिक लोकांच्या उपजिविकेची संधी वाढविण्यासंबंधीच्या योजना राज्य, केंद्र शासन, इतर राज्याचे शासन, शासकीय, अशासकीय उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहायतेने वन व वनेतर क्षेत्रामध्ये प्रभावीपणे अंमलबजावणी करणार आहेत. राज्यातील निसर्ग पर्यटन धोरण प्रभावीपणे कार्यान्वित करण्यासाठी केंद्रीय यंत्रणा म्हणून कार्य करण्यासोबतच निसर्ग पर्यटनासंबंधीत शासकीय धोरण, कायदा आणि कार्यपद्धती सुसंगत करणार आहे. तसेच नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर आणि शाश्वत व्यवस्थापन होण्यासाठी प्रमाणीकरण, सनियंत्रण, परिणाम मूल्यांकन आणि नियमनासंबंधी उपाययोजना करण्यात येणार आहे. पर्यावरण, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिकदृष्ट्या उपयुक्त पर्यटन कार्यक्रम राबविण्यासाठी भागीदारांची क्षमता बांधणी करण्यात येणार आहे. राज्यातील पर्यटनस्थळांना आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचविण्यासाठी आंतरराष्ट्रीय संस्थेची सदस्यता प्राप्त करण्यासह त्यांच्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी हे मंडळ प्रयत्न करणार आहे.

-----०-----

नगर विकास विभाग

<u>पिंपरी चिंचवड विकास योजना</u>

**खेळाच्या मैदानासाठी स्वतंत्र उपयोग नसलेले**
**क्षेत्र आरक्षणातून वगळण्यास मान्यता**

पिंपरी-चिंचवड शहराच्या मंजूर विकास योजनेतील पिंपरी येथे असलेल्या खेळाच्या मैदानाच्या आरक्षणातून सिटी सर्व्हे क्रमांक ५६७०(पै) या त्रिकोणाकृती क्षेत्राचा खेळाच्या मैदानासाठी स्वतंत्र उपयोग होणार नसल्याने या क्षेत्रासह सिटी सर्व्हे क्रमांक ५६६९(पै) आणि सिटी सर्व्हे क्रमांक ५६६३(पै) क्षेत्र याबाबतच्या आरक्षणातून वगळण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

पिंपरी चिंचवडच्या मंजूर विकास योजनेमध्ये पिंपरी येथे प्रस्तावित आरक्षण क्र.९९ हे खेळाच्या मैदानासाठी ठेवण्यात आले आहे. मात्र, विकास योजनेच्या १२ मीटर रुंद रस्त्यामुळे या आरक्षणाचे दोन भाग झाले आहेत. त्यातील मोठा एक भाग आरक्षणात कायम ठेवून पश्चिमेकडील सिटी सर्व्हे क्रमांक ५६७० पैकी सहा आर क्षेत्राचा त्रिकोणी आकाराचा छोटा भाग आकाराचा भाग आरक्षणातून वगळण्यात येणार आहे. हा भाग अत्यल्प असल्याने त्याचा क्रीडांगणासाठी स्वतंत्र उपयोग होणार नसल्याने संबंधित प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

-----०-----

कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

<u>अशासकीय अनुदानित शाळा</u>

**व्यवसाय, द्विलक्षी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील**
**पूर्णवेळ शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी**

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील अशासकीय अनुदानित शाळातील व्यवसाय अभ्यासक्रम तसेच द्विलक्षी अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थेतील पूर्णवेळ शिक्षकांना शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारितील शिक्षकांप्रमाणेच पाचव्या वेतन आयोगातील वेतनश्रेण्यांचा लाभ १ जानेवारी १९९६ पासून ३१ मार्च २०१४ पर्यंत काल्पनिकरित्या आणि १ एप्रिल २०१४ पासून प्रत्यक्षरित्या लागू करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमडळ बैठकीत घेण्यात आला.

पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील अशासकीय अनुदानित शाळातील व्यवसाय अभ्यासक्रम तसेच द्विलक्षी अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थेतील पूर्णवेळ शिक्षकांना शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारितील उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकाप्रमाणे सुधारित त्रिस्तरिय वेतनश्रेणी १ मार्च २००० पासून लागू करण्यात आली होती. मात्र, शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारितील शिक्षकांना २६ फेब्रुवारी २०१४ च्या शासन निर्णयानुसार १ जानेवारी १९९६ पासून वेतनश्रेणी लागू करण्यात आली. ही तफावत दूर करण्यासाठी अशासकीय अनुदानित शाळातील व्यवसाय अभ्यासक्रम तसेच द्विलक्षी अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थेतील पूर्णवेळ शिक्षकांनाही ही वेतनश्रेणी १ जानेवारी १९९६ पासून लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

-----०-----

सहकार विभाग

ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी निर्णय

**एफआरपीची उर्वरित रक्कम देण्यासाठी**
**कारखान्यांना सॉफ्ट लोन योजनेचा लाभ**

गेल्या हंगामात गाळप करून ३१ ऑगस्ट २०१५ अखेर ५० टक्क्यांपेक्षा जास्त एफआरपीची (रास्त आणि किफायतशीर दर) रक्कम ऊस उत्पादकांना देणाऱ्या सहा साखर कारखान्यांना उर्वरित रक्कम देता यावी यासाठी राज्य शासनाच्या सॉफ्ट लोन योजनेचा लाभ देण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

केंद्राच्या सॉफ्ट लोन योजनेच्या निकषात बसू शकले नाहीत, अशा राज्यातील साखर कारखान्यांना ऊस उत्पादकाना एफआरपीची उर्वरित रक्कम देता यावी, यासाठी राज्य शासनाने सॉफ्ट लोन योजना राबविण्याचा निर्णय गेल्या सप्टेंबरमध्ये घेतला होता. मात्र, राज्य शासनाच्या सॉफ्ट लोन योजनेत काही तांत्रिक कारणांमुळे अपात्र ठरलेल्या सहा साखर कारखान्यांना सॉफ्ट लोन योजनेतून व्याज अनुदान देण्यात येणार आहे. त्यानुसार महाडिक शुगर लिमिटेड जि. कोल्हापूर, स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना लिमिटेड दहीटणे, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर, माणगंगा सहकारी साखर कारखाना लिमिटेड सोनारसिद्धनगर, ता. आटपाडी, जि. सांगली, कुमुदा-रयत सहकारी साखर कारखाना लिमिटेड शेवाळवाडी, ता. कराड, जि. सातारा, चोपडा शेतकरी सहकारी साखर कारखाना लिमिटेड चहार्डी, ता. चोपडा, जि. जळगाव आणि महाराष्ट्र शेतकरी शुगर लिमिटेड साईखेड, ता. सोनपेठ, जि. परभणी यांचा समावेश आहे.

साखर कारखान्यांना बँकांमार्फत ३१ डिसेंबर २०१५ पर्यंत मंजूर व वितरित केलेले कर्ज व्याज अनुदानास पात्र ठरणार आहे. सरळ व्याजाच्या १० टक्के किंवा बँकेकडून आकारण्यात येणारा व्याजदर यामधील जो दर कमी असेल, त्यानुसार ५ वर्षाचा रेड्युसिंग बॅलन्सनुसार सरळ व्याजाची रक्कम अनुदान स्वरुपात देण्यात येणार आहे. योजनेतील सहा साखर कारखान्यांना त्यांच्या उत्पादित पांढऱ्या साखरेच्या ११ टक्के किंवा ३१ ऑगस्ट २०१५ अखेर प्रलंबित ऊस देयकातून उचल न केलेले तारण कर्ज वजा जाता उर्वरित रकमेपैकी जी रक्कम कमी असेल इतक्या कर्जास त्यांच्या कर्ज उचल क्षमतेनुसार अनुदान देण्यात येईल. त्यानुसार हे कारखाने अंदाजे ३८ कोटी ३७ लाख ८० हजार इतक्या कर्ज रकमेस पात्र असून त्यांना ५ वर्षांचे व्याज अनुदान देण्यासाठी अंदाजे ११ कोटी ५१ लाख ३२ हजार रुपये एवढ्या रकमेचा भार शासनावर पडणार आहे.

-----o-----